नि. दिवाणी दावा क्र. १०५/२०२१
दादाराव –वि– बाबुराव
निशाणी क्र. १८ लगत

## उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. पी. एन. कड यांच्याकडून

०२. मी अशिक्षीत आहे. मला मराठी वाचता येते. मला ७/१२ मध्ये करण्यात आलेल्या नोंदी समजतात. दावा मिळकतीचा पुर्वीचा सर्वे क्र.२६ होता व त्याचे मुळ मालक मारोती शेठ म्हणुन व्यक्ती होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर मारोती शेठ च्या वारसांच्या नावे ७/१२ मध्ये आजरोजी दावा मिळकत दावा मिळकत नोंदविण्यात आली आहे. सदर वारसांनी माझ्या लाभामध्ये कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण पत्र करुन दिलेले नाही. दावा मिळकत गट क्र.९७ चे एकुण क्षेत्र ३ हे. ४८ आर इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकतीमधून काही क्षेत्र सरकारतर्फे पाझर तलावाकरीता संपादित करण्यात आले आहे.

०३. मला दोन भाऊ आहेत. प्रतिवादी क्र.३ चे वडील गोविंदा हे माझे चुलते आहेत. गोविंदा यांना प्रतिवादी क्र.३ व देविदास अशी दोन मुले होती. माझे वडील नामदेव यांना श्रीपत नावाचा अजुन एक भाऊ होता. त्यांना शेषराव व आण्णा अशी दोन मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीची पुर्वीपासून माझे वडील नामदेव व त्यांचे भाऊ श्रीपत व गोविंदा असे वहिवाट करत होते. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीवर पुर्वी माझे आजोबा विठोबा यांचा ताबा होता.

०४. दावा मिळकत गट क्र.९७ पैकी माझ्या ताब्यामध्ये असलेल्या मिळकतीच्या पुर्वेस नदी, पश्चिमेस दामोदर घायवट यांची जमीन, दक्षिणेस शिवाजी रामराव व शंकर रामराव यांची जमीन व उत्तरेस तुळशीराम बागल व बाबु मगरे यांची जमीन आहे. सदर मिळकतीचे क्षेत्र ३ हे. ४८ आर इतके आहे. मी वर नमुद चतुःसिमा ही संपुर्ण दावा मिळकत गट क्र.९७ ची सांगितली आहे.

प्रश्नः प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या ताब्यातील जमिनीची चतुःसिमा तुम्हाला सांगणे शक्य आहे का?

उत्तरः प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा गट क्र.९७ मध्ये ताबा नाही.

शासनाने ज्यावेळी गट क्र.९७ मधील क्षेत्र पाझर तलावाकरीता संपादित केले त्याबाबतचा मोबदला देखील दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा संपादनाचा

मोबादला स्विकारण्यासाठी प्रतिवादी क्र.३ व शेषराव श्रीपत घायवट यांना देखील नोटीस प्राप्त झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, संपादन प्रक्रियेमध्ये सुरुवातीस रक्कम रु.४८,०५३/– इतकी मंजूर झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची रक्कम प्रतिवादी क्र.३ व शेषराव श्रीपत घायवट यांच्या नावे आली होती. मी स्वतः मोबदल्याची रक्कम शेषराव व प्रतिवादी क्र.३ यांना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मोबदला रक्कम ताब्यानुसार देण्यात आली होती.

०५. दावा मिळकत गट क्र.९७ चा ७/१२ उतारा मी सन १९९६ पासून पाहत आहे. मी सदर उता–यावरील मालकी रकाना तसेच वहिवाट रकान्यामधील नोंदी पाहिलेल्या आहेत. निशाणी क्र.२७ कडील ७/१२ उता–यामध्ये श्रीपत विठोबा घायवट, गोविंदा विठोबा घायवट व नामदेव विठोबा घायवट यांच्या नावाची सन १९९६ ते २००० या कालावधीकरीता वहिवाट रकान्यामध्ये नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, श्रीपत व गोविंदा मयत झाल्यानंतर गट क्र.९७ ही मिळकत वारसा हक्काने त्यांच्या मुलांच्या ताब्यामध्ये आली आहे.

०६. मी दावा मिळकत गट क्र.९७ मध्ये कुळ हक्काने माझ्या नावाची नोंद व्हावी याकरीता तहसिलदार भोकरदन यांच्याकडे अर्ज दिला होता. मी त्यामध्ये पाझर तलावासाठी संपादित जमिनीव्यतिरीक्त इतर जमीन कुळ हक्काने मागितली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आला आहे. मी दाखल केलेल्या निशाणी क्र.२६ ते ३० या कागदपत्रांव्यतिरीक्त दावा मिळकतीमध्ये माझा ताबा आहे हे दर्शविण्यासाठी कोणताही दस्तऐवज दाखल केलेला नाही.

०७. मला जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे पाझर तलावामध्ये संपादित झालेल्या क्षेत्राकरीता मोबदला मिळण्यासाठी माझे वडील व माझे दोन्ही काका यांनी प्रतिज्ञापत्र सादर केल्याचे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचा देखील ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.९७ मध्ये मी म्हणतो त्याप्रमाणे माझा ताबा नाही.

०८. सन २००७ मध्ये दावा मिळकतीची स्थळपाहणी करण्यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी आले होते. मला स्थळ पाहणी करतांना केलेल्या पंचनाम्याबाबत माहिती आहे. मी सदरचा पंचनामा वाचुन पाहिला होता. मी सदर पंचनाम्यावर सही केली नव्हती. साक्षीदार सांगतो की पंचांची घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनाम्यामध्ये प्रतिवादींचादेखील ताबा असल्याचे दर्शविण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनाम्यामध्ये दावा मिळकत माझ्या ताब्यात नाही असे नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की,

सदर पंचनाम्यापासून मी प्रतिवादींना दावा मिळकतीमधून बेदखल करण्याचा प्रयत्न करत आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यामध्ये मालक म्हणुन नमुद असलेल्या व्यक्ती कोठे आहेत याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मालकांनी केव्हाही दावा मिळकतीचा ताबा मागितलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर अतिक्रमण करण्यासाठी मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

(मयुरेश आर. काळे)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर

भोकरदन

दिनांकः १९.०१.२०२६